# विषय : संतसाहित्याचे कृषियोगदान

कु. वैखरी दिलीप नवेले

संशोधक विद्यार्थी

राज्यशास्त्र विभाग

अण्णासाहेब वर्तक महाविद्यालय , वसई रोड (पश्चिम)

ता. वसई, जि.पालघर

## ❖ प्रस्तावना

संतांचे साहित्य अत्यंत विपुल व विविध स्वरूपाचे आहे. संत साहित्याचा प्रभाव हा सामाजिक, राजकीय , सांस्कृतिक घडामोडींवर पडत असतो आणि या सर्वांचे चित्रण सुद्धा त्यांच्या साहित्यातून दिसून येते. खरे तर सर्वसामान्य लोकांपासून अगदी विद्वान पंडितांपर्यंत अनेकांनी संत साहित्याकडे केवळ भक्तिरसाच्या दृष्टीनेच पाहिले आहे. कारण संत साहित्य हे भक्तीरसात बुडून गेले आहे. हे जरी तितके खरे असले तरीही संतसाहित्य हे केवळ भक्तिरसापुरते मर्यादित नसून त्यामध्ये लोकप्रबोधन, लोकजागृती आणि लोक चळवळ करणे हा उद्देशही दिसून येतो. म्हणूनच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात संत साहित्याला मानाचे स्थान प्राप्त झालेले आहे.

संतसाहित्यातील भक्ती आणि अध्यात्म या विषयांशिवाय इतर अनेक अंगांनी अभ्यास करण्याचे प्रयत्न गेल्या खूप वर्षांपासून झाले आहेत. त्यामुळेच संत साहित्यातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक विचार समोर आला. समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रांत संत साहित्याचे योगदान दिसून येते. जे ग्रामीण जीवन संत जगले, ते त्यांच्या साहित्यात उमटणे, प्रतिबिंबित होणे स्वाभाविकच होते. आपले ग्रामीण जीवन कृषिप्रधान असल्याने संतसाहित्यात शेती आणि शेतीशी संबंधित व्यवसायांचे अधिक ठळक प्रतिबिंब उमटलेले दिसून येते.

संतसाहित्याच्या साऱ्या अभ्यासकांचे ऋण मान्य करून संत साहित्य हे शेतीक्षेत्रासाठी कसे मार्गदर्शक ठरू शकते, हे सांगण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे. संत साहित्य आणि त्यातील शेतीविषयक विचार हा एक गहन संशोधनाचा विषय आहे. संतानी साहित्याच्या माध्यमातून तत्कालीन शेतीविकासासाठी केलेला उपदेश आणि संतसाहित्याचा कृषिसंस्कृतीशी असणारा निकट संबंध स्पष्ट व्हावा या हेतूने संशोधक विद्यार्थी म्हणून याविषयी अभ्यास करणे गरजेचे वाटले. ही भूमिका आपण समजून घ्याल ही अपेक्षा व्यक्त करते आणि आपल्या विषयाकडे वळते.

## ❖ संशोधन उद्दिष्टे

- संत साहित्यातील वैविध्यता जाणून त्यातील शेतीविषयक रचना अभ्यासणे.
- कृषिक्षेत्रातील संत साहित्याचे योगदान विविध अभंगांद्वारे समजून घेणे.

## ❖ संशोधन पद्धत

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये कृषिविषयक संत साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे. यासाठी दुय्यम संदर्भ ग्रंथ वाचण्यात आले. आंतरजालीय संकेतस्थळांवरून माहिती घेण्यात आली आहे. काही विशेषांक आणि त्यातील शोधनिबंधांचे वाचन उपयोगी ठरले.

## ❖ संत साहित्य आणि शेती

प्राचीन काळापासून भारतीय लोकांचा व्यवसाय शेती हा आहे. माणसाच्या अस्तित्वापासून शेती अस्तित्वात आहे. शेती हा ग्रामीण जीवनाचा पाया आहे. आर्यांच्या पूर्वीपासून भारतात कृषिविद्या आणि कृषिसंस्कृती नांदत होती. ऋग्वेद व अथर्ववेदातही कृषिविषयक पुष्कळ उल्लेख आढळतात. ऋग्वेदातील एका सूक्तात असे म्हटले आहे की....

**शुनं वाहाः शुनं नरः**

**शुनं कृषतु लाङ्गलम् |**

**शुनं वस्त्रा बध्यन्तां**

**शुनमष्ट्रामुदिडगय ||**

' बैल आनंदाने आणि लोकही मजेने सहजरीतीने भूमी नांगरो. नांगराचे फाळ जमीन सहज नांगरोत. शेतकरी सहजपणे बैलासह फिरोत. सर्वांना सुख होईल अशा रीतीने पर्जन्य मधुर रसाने आणि उदकाने जमीन भिजो. आमच्या ठिकाणी सुखाची ठेव निर्माण होवो, आणि त्यातून आमचा योगक्षेम उत्तम होवो ' अशी अपेक्षा व्यक्त करणारे हे सूक्त प्राचीन कृषिसंस्कृतीचे मोठेपण सांगत आहे. (देखणे)

भारताच्या अर्थव्यवस्थेमध्ये शेती क्षेत्राचे स्थान पाठीच्या कण्यासारखे आहे, असे नेहमी म्हटले जाते. पाठीचा भक्कम कणा जसे शरीराला आधार देतो, तसेच शेतीक्षेत्रही अर्थव्यवस्थेला विविध प्रकारे आधार देत असते. शेती क्षेत्रात होणाऱ्या विविध घडामोडींचा अर्थव्यवस्थेवर प्रत्यक्ष परिणाम होताना आपल्याला दिसून येतो. शेतीचा विकास अर्थव्यवस्थेला मजबूत करतो. कालानुरूप शेतीचे स्वरूप बदलत गेले. विविध आव्हानांना शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागले आणि आताही त्यांच्यापुढे विविध समस्या आ वासून उभ्या आहेत. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणारे विविध कार्यक्रम, त्यांना शेतीकामात साहाय्य करणाऱ्या विविध योजना शासकीय पातळीवर कार्यरत आहेत. परंतु शेती मुळातच निसर्गावर आधारित असल्या कारणाने त्यातील नैसर्गिक घटक समजून घेऊन त्या दृष्टीने शेतकऱ्यांचे प्रबोधन करणे महत्वाचे ठरते. शेती ही सुद्धा एक कला आहे आणि ती जर विशिष्ट रचनात्मक पद्धतीने केली तर निश्चितच शेतकऱ्यांना त्याची मदत होईल.

या पार्श्वभूमीवर आपल्या संतानी साहित्यातून मांडलेले शेतीविषयक विचार अत्यंत उपयोजित आहेत. वृक्ष, वल्ली, डोंगर, नदी, फुले, फळे, पशु, पक्षी, वारा, सूर्य, कीटक, गवत, गाई, गुरे, वने, अरण्ये, पाऊस, इत्यादी विषयांवरील अनेक संदर्भ संतसाहित्यात आढळतात. काही ठिकाणी या घटकांचा संतसाहित्यात दृष्टांत म्हणून उपयोग करण्यात आला आहे. शेती हा लोकांचा जवळचा विषय आणि उपजीविकेचे साधन असल्याने त्याविषयीच्या समस्या दूर करण्यासाठी संतांनी आपल्या

साहित्यात शेतीविषयक कामे आणि ती करताना घ्यावयाची काळजी, शेतीसाठीची पूर्वतयारी, शेती मध्ये वापरण्यात येणारी साधने आणि त्यांची हाताळणी, शेतकामासाठी आवश्यक तंत्रे, शेतकामात येणाऱ्या अडचणी, शेतीमधील विविध घटकांचा परस्परसंबंध, इत्यादींवर लोकांना मार्गदर्शन केले आहे.

- **संत तुकाराम**

संत तुकाराम हे शेतकरी कुटुंबात जन्मले होते. एके ठिकाणी ते म्हणतात,

**'बरे देवा कुणबी केलो ||**

**नाहीतर दंभे असतो मेलो ||'**

"देवा , मी शेतकरी झालो म्हणूनच बरे. कुणबी नसतो तर शेत व कुणबीकीपासून दूर जाऊन दंभाने मेलो असतो."

**वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे|**

**पक्षीही सुस्वरे आळविती ||**

संत तुकारामांनी वरील प्रख्यात ओळींतून कृषिसंस्कृतीतील महत्वाचा घटक म्हणजे वृक्षसंवर्धन किती महत्वाचे आहे हे सांगितले आहे.

**एक बीजा केला नाश |**

**मग भोगिले कणीस ||**

या ओळींतून संत तुकाराम म्हणतात की धान्याच्या एका दाण्यातून हजारो दाणे तयार होतात. बीजाचे रुपांतर झाडात होते, मग त्याला कणसे येतात. बीजाने आत्मसमर्पण केल्यावर कणसाच्या रूपाने ते बहरून येते.

**शुद्ध बीजापोटी |**

**फळे रसाळ गोमटी ||**

ज्या बीजामधून झाड तयार होते, ते बीजही शुद्ध हवे. शेती मध्ये शुद्ध, उत्तम प्रतीचे बियाणे वापरले तरच त्यातून चांगले धान्य पिकेल. अमृताच्या वेलीला अमृताचीच फळे येणार हे शाश्वत सत्य आहे.

**खोल ओले पडे ते पिक उत्तम ||**

**उथळाचा श्रम वाया जाय ||**

शेतात पेरणी करताना जर बियाणे खोलवर रुजविले तरच उत्तम पिक येते असे, तुकोबाराय सांगतात.

**सिंपिले ते रोप वरीवरी बरे |**

**बाळलिया पुरे कोंभ नये |**

परंतु रोप नुसतेच लावले आणि त्याला पाणीच दिले नाही तर त्याची वाढ अशक्य आहे, असे सांगून तुकोबांनी या लहान रोपट्याला लहानपणीच भरपूर पाणी घालून त्याची निगा राखण्याचा सल्ला दिला आहे. त्यादृष्टीने खालील अभंग महत्वाचा आहे.

**सिंचन करीतां मूळ |**

**वृक्ष वोल्हावें सकळ ||**

झाडाच्या मुळाला भरपूर पाणी घातल्यावरच झाड वाढणार आहे. रोपाच्या संवर्धनातून झाडाची वाढ होणे आणि फळे चाखायला मिळणे यातून संत तुकारामांचा अध्यात्मिक भावसुद्धा दिसून येतो.

शेतीविषयक बाबींची त्यांना चांगली माहिती होती. शेतकऱ्याने पेरणी करताना किती जागरूक असावे लागते याचे विवेचन तुकोबारायांनी एका अभंगात केले आहे.

**मढे झाकोनिया करीत पेरणी |**

**कुणबियाचे वाणी लवलाहे ||**

**तयापरी करी स्वहित आपुले |**

**जयासी फावले नरदेह ||**

**ओटीच्या परीस मुठीचे ते वाढे |**

**यापरी कैवाड स्वहिताचे ||**

पाऊस पडल्यानंतर जमिनीत एक प्रकारचा 'वाफसा' किंवा ओलावा तयार होतो. मात्र हा ओलावा जास्त वेळ टिकत नाही. वाफसा नसताना पेरणी होऊ शकत नाही. म्हणूनच वाफसा निर्माण झाल्यावर लगेचच पेरणी करणे आवश्यक असते. परंतु एखाद्या वेळेस दुर्दैवाने वाफसा होण्याच्या वेळेतच एखाद्या शेतकऱ्याच्या घरी कुणाचा मृत्यू झाला तर काय करावे याचे समर्पक उत्तर तुकाराम या अभंगातून देतात. अशावेळी जर कुणाचा मृत्यू झाला तरी ते प्रेत झाकून ठेवावे आणि प्रथम शेतातील पेरणी उरकून घ्यावी. प्रेताची उत्तरक्रिया कधीही शक्य आहे, परंतु वाफसा निघून गेल्यावर पेरणी झाली नाही तर वर्षभर अन्नधान्य मिळणार नाही, असे तुकोबांना सांगायचे आहे. शेतकरी केवढा मोठा कर्मयोगी असू शकतो याचे चिंतन या अभंगातून घडते.

**शेत आलें सुगी सांभाळावे चारी कोन ||**

**पिका आले परी केले पाहिजे जतन ||**

**सोकरी, सोकरी विसावा तोवरी उभे आहे तो ||**

**गोफणेंसी गुंडा घाली पागोऱ्याच्या नेटे ||**

**पळती हाहाकारे अवघी पाखरांची थाटे ||**

सुगीच्या दिवसांत शेतात आलेले पिक चोरांपासून सांभाळण्याची, ते जतन करण्याची जबाबदारीही शेतकऱ्यांचीच आहे. हातात गोफण घेऊन आलेल्या पाखरांना उडवावे लागते. रात्रंदिवस डोळ्यांत तेल घालून या धान्याची राखण करावी लागते.

शेतीचे काम व्यवस्थित पार पाडण्यासाठी शेतकऱ्यास पशूची गरज लागतेच. गाडीला जुंपण्यासाठी, औतकामासाठी, बैलासारखे प्राणी खूपच उपयोगी पडतात. यादृष्टीने तुकोबाराय म्हणतात,

**दही दूध ताक पशूचे पाळण**

**किंवा**

**भूतदया गायी पशूंचे पाळण |**

**तान्हेल्या जीवन वनामाजी |**

**तुका म्हणे हेचि आश्रमाचे फळ |**

**परमपद बळ वैराग्याचे ||**

गोठ्यातील जनावरे ही शेतकऱ्याची गोधने आहेत. गृहस्थाश्रमी शेतकऱ्याला त्याच्या गृहस्थधर्माचे कर्तव्य सांगताना तुकोबा गायी, पशुपालन या गोष्टींना प्राधान्य देतात.

**दुष्काळे अटिता भेणे**

**मंद झाल्या मेघवृष्टी**

**आकांतली कावे सृष्टी**

**देव रिगाले कपाटी**

**आटा आटी प्रवर्तली**

अशा प्रकारे संत तुकारामांच्या विविध अभंगांत शेतीत बियाणे रुजाविण्यापासून, पेरणी, पिकाची मशागत, पिकाचे संवर्धन आणि संरक्षणपर्यंत तसेच शेतकऱ्याचे कर्तव्य, शेतीसाठी आवश्यक पशुपालन, दुष्काळ, महापूर इत्यादी कृषीक्षेत्राला साहाय्य होणाऱ्या बारीकसारीक बाबींचा उल्लेख दिसून येतो.

- **संत ज्ञानदेव**

शेतीच्या कामाला सातत्य असावे लागते असे सांगताना ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

**'प्रतीवर्षी' क्षेत्र पेरिजे ||**

**पिके तरी वाहो नुबागिजे ||**

**पिकासी निवाडु देखिजे ||**

**अधिकाधिक ||**

प्रत्येक वर्षी धान्य पिकते, परंतु त्यासाठी प्रत्येक वर्षी पेरणीही करावी लागते. एखाद्या वर्षी खूप धान्य झाले म्हणून पुढच्या वर्षी पेरुच नये असे शेतकऱ्याने करता कामा नये. धनधान्याची

समृद्धी येण्यासाठी पेरणी करायलाच हवी आणि जे पिकेल त्याची मशागतही तत्परतेने करायला हवी. उगवलेल्या शेतातील तण काढून आलेल्या पिकाचे रक्षण करायला हवे.

**तरी भूमीबीज नांगरू ||**

**यया भांडवलाचा आधारु ||**

**घेऊनी लाभु अपारु**

**मेळविणे जे ||**

जमीन, बीज आणि नांगर हे शेतकऱ्याचे भांडवल आहे. या भांडवलाच्या मदतीनेच तो आपली शेती फुलवितो. हे भांडवल जरी थोडे असले तरी श्रम घेण्यात कधीही कमी पडू नये असा सल्ला ज्ञानेश्वर माऊलींनी दिला आहे.

**कां तृणाचा बाहुला ||**

**जो आगरामेरे ठेविला ||**

**सो साचचि राखता कोल्हा ||**

**मानिजे ना ||**

शेतातील पिकाचे पशुपक्ष्यांपासून रक्षण करण्यासाठी गवताचे बुजगावणे शेतात उभे करतात. त्या बुजगावण्याला रखवालदार समजून आलेला कोल्हा घाबरून निघून जातो. बुजगावण्यापासून शेताचे रक्षण होते हे समजून घेणे म्हणजेच कृषिज्ञान अवगत करणे असेच ज्ञानेश्वर माऊलींना सांगायचे आहे.

**किंबहुना कृषि जीणे |**

**गोधने राखोनी वर्तने ||**

ज्ञानेश्वर माऊली म्हणतात, शेतकऱ्याने शेती करताना गोधने राखायलाच हवीत.

**पाणी मुदत झाडा जाये |**

**तृण ते प्रसंगेचि जिये |**

**तैसा एका बोलिले हो ये |**

**सर्वही हित ||**

**म्हणोनी तयाचा ठायी |**

**शेणा सोनया विशेषु नाही |**

**रत्ना गुंडेया काही नेणे |**

**जे भेदु ||**

योग्यवेळी पिकांना पाणी देणे हे पिकांच्या उत्तम वाढीसाठी आवश्यक असते. पशुंचे शेण शेतीमध्ये वापरणे ही पारंपारिक पद्धत कृषिक्षेत्रात आवश्यक आहे हे संत ज्ञानेश्वरांच्या साहित्यात मांडलेले दिसते.

- **संत एकनाथ**

संत एकनाथ महाराजांनी भावार्थ रामायणाच्या युद्धकांडात दृष्टांत दिला आहे,

**‘ झालिया नरदेहप्राप्ती |**

**परमार्थ साधावा हातोहाती |**

**जेवी कृषिवलाची स्थीती |**

**मढे झाकीती पेरणीसी ||**

शेतकरी प्रेते झाकून पेरणी करण्यासाठी जशी तत्परता दाखवतो तशी तत्परता माणसाने परमार्थ साधण्यासाठी दाखवावी असे एकनाथांना सांगायचे आहे.

- **संत नामदेव**

नामाचे महत्व सांगताना संत नामदेव म्हणतात, जसे एक बीज पेरून गाडी भरून धान्य घेता येते, तसेच नामबीज व्यापक परमात्म्याला घेऊन येते.

**‘ शेतीबीज नेता थोडे ||**

**मोटे आणि तातीगाडे ||’**

**‘ एक या नामे हरी जोडे ||**

**फीटे जन्माचे साकडे ||**

**नामा म्हणे नेणे मुढे ||**

**नाम स्मरावे साबडे**

अभंगांतून शेतीच्या विविध घटकांचा दृष्टांत म्हणून वापर केलेला आढळून येतो.

- **संत चोखोबा**

संत चोखोबा हे महार जातीत जन्माला आलेले संत असून त्यांनी अस्पृश्यतेला तोंड देता देता शेतीतील पिके आणि शेतीसंबंधी घटकांचा उपयोग करून आपल्या साहित्यातून समाजाला मानवताधर्म शिकवला आहे.

**ऊस डोंगा परि | रस नोहे डोंगा**

**काय भुललासी वरालिया रंगा**

**चोखा डोंगा परि | भाव नोहे डोंगा**

- **संत सावता माळी**

संत सावता माळी यांनी कांदा मुळा भाजीमध्ये श्रीविठ्ठलाचे दर्शन घेतले आणि भक्तीचा मळा फुलविला,

**कांदा मुळा भाजी | अवघी विठाबाई माझी ||**

**लसुण मिरची कोथबिंरी | अवघा झाला माझा हरी ||**

**मोट नाडा विहीर दोरी | अवघी व्यापली पंढरी ||**

**सावता म्हणे केला मळा | विठ्ठल पायी गोविला गळा ||**

सावतोबांचा हा अभंग शेतकऱ्याचे कर्मयोगी जीवन मांडणारा एक आदर्शाच ठरला आहे.

- **संत बहिणाबाई**

संत बहिणाबाईंच्या अनेक ओव्यांत शेतीचे चित्रण दिसून येते.

**धरतीच्या कुशीमधी, बीयबियानं निजली**

**वऱ्हे पसरली माटी, जशी शाल पांघरली**

**बीय टरारे भुईत, सर्वे कोंब आले वऱ्हे**

**गहयरल शेत  जसं अंगावरती शहारे**

**ऊन वाऱ्याशी खेयता एका एका कोंबातून**

**पर्गटले  दोन पानं जसे हात जोडीसन**

**टाया वाजवती पान दंग देवाच्या भजनी**

**जसे करती कारोन्या होऊ दे रे आबादनी....**

बहिणाबाईंच्या अनेक गाण्यांत भक्ती आणि शेती विचार दिसून येतात.

- **राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**

**अशुद्ध शेतीवरी पिकेना सुंदर फुल रे गड्या |**

**शुद्ध कर मृतिका नरबापुड्या || धृ ||**

**वर-वर घेऊनि पिके , बुडविले शेत कसे त्वा अरे ?**

**आता का घेशि कर्म-नाव रे ?**

**वाढविले शेतात वृक्ष बहु, काम जयांचे नसे |**

**उडविले पैसे, खाली खिसे || कृ ||**

**श्रीमंत संत तो धनी जगी धरवरी |**

**जा शरण तयाला चरण धरी वरवरी ||**

**घे मत त्याचे मग शेत पिके भरपुरी |**

**विवेकशास्त्रा घेऊनि हाती, वृक्ष ताडि शूर गड्या ||**

**शुद्ध कर मृतिका नरबापुड्या ||१||**

**धर नांगर, ज्ञानाग्नि चक्षुने जाळि अज्ञ-वृक्षया |**

**पालवी-खोड मुळासह तया |**

**बैल-काम क्रोधादि जुंपुनी, माया-जू धर वरी |**

**साफ कर देह-शेत अंतरी ||**

**असत्य दिसते सत्याजये, असत्य ते फेकि विषय बाहिरी |**

**ते फळ मग ब्रह्म पीक भूवरी |**

शेतात अस्वच्छता, अनावश्यक गवत व तण, दगडगोटे व अशुद्ध माती असेल तर उत्तम प्रतीचे पिक शेतात येत नाही. म्हणून शेतातील या सर्व गोष्टी काढून टाकून अनुभवी आणि तज्ञ व्यक्तीच्या सल्ल्याने शेती करावी असे संत तुकडोजी महाराज सांगतात. वरवर ना नांगरता बैलांच्या मदतीने नांगर मातीत खोलवर घालून शेत चांगले नांगरावे असे पारंपारिक ज्ञान संत तुकडोजींच्या साहित्यात आढळते. आपल्या रचनेतून अध्यात्म आणि कृषि यांची सांगड त्यांनी घातली आहे.

- **समर्थ रामदास स्वामी**

भारतीय संस्कृती ही कृषिप्रधान संस्कृती आहे. धनधान्यसमृद्धी यावी, हीच समृद्धीची कल्पना भारतीय संस्कृतीत मानली गेली आहे. समर्थ रामदास स्वामी म्हणतात,

**धनाधान्याचे संचित ||**

**करणे लागे सावचित्त ||**

**नाना पशुते पाळावी ||**

**नाना कृत्ये सांभाळावी ||**

धनधान्याची साठवण आणि पशुंचे पालन हे शेतकऱ्याचे आद्य कर्तव्य आहे.

**वेळे पाऊस पडेना | नासकवणी उघडेना ||१||**

**ऐसे कुळवाड्याचे भंड | दुःख जाहले उदंड ||२||**

**बहु पडी आले शेत | रेड्या पाड्याचे आऊत ||३||**

**काही केल्याने पिकेना | धान्य वेळेसी विकेना ||४||**

**फाळा लावीला उदंड | अवघे जाहले थोतांड ||५||**

**वारी रोगांची वाजती | नाना आभाळे फिरती ||६||**

**टोळ पक्षी मुषकादिक | खाती श्वापदे अनेक ||७||**

**दावेदाराची यातना | चोर चोरटे राहेना ||८||**

शेतकऱ्याला घरात धान्य येईपर्यंत किती संकटांचा सामना करावा लागतो, याचे सुंदर वर्णन समर्थांनी वरील अभंगातून केले आहे.

वारूळ हे भूमिदेवतेचे प्रतिक आहे आणि सर्प हा वारुळात राहणारा आहे. म्हणून भूमीच्या उपजावू शक्तीशी त्याचा संबंध जोडण्यात आला आहे. शेतातील पिकांची नासाडी करणारे उंदीर, बेडूक यांचा नाश साप करीत असल्यामुळेच तो शेतकऱ्यांचा मित्रच बनला आहे. त्याची उपयुक्तता लक्षात घेऊन भारतात सर्पपूजा केली जाते. साप म्हटले की तो केवळ चावणारच असे वाटून सापाला विरोध करणे योग्य नाही. याद्दष्टीने समर्थ म्हणतात,

**सर्प डसाया येतो |**

**प्राणी भिऊन पाळतो |**

**एक अंतःकरण तरी तो |**

**विरोध नसावा ||**

साप म्हणजे तो फक्त चावणारच आहे आणि आपण त्याला घाबरलेच पाहिजे असा विचार न करता त्याच्याविषयीचा गैरसमज आणि विरोध कमी करणे हे शहाणपणाचे लक्षण आहे.

पाऊस ही आपल्या देशात अत्यावश्यक बाब आहे. पाऊस पडला तरच धान्य पिकते. नद्या-विहिरींना पाणी टिकते, भूमी सुजलाम-सुफलाम होते. म्हणूनच कृषिसंस्कृतीने पर्जन्याला देवता म्हणून स्वीकारले आहे. मेघ तयार होणे आणि पर्जन्य बरसणे हे प्रक्रिया समर्थ रामदासांनी प्रभावीपणे मांडली आहे. ते म्हणतात,

**वायू मेघाचें भरण भरी |**

**सवेंच पिटून परतें सारी |**

**वायो ऐसा कारभारी |**

**दुसरा नाही ||**

**गिरीहून दाट फौजा**

**मेघ उठीले लोककाजा |**

**गर्जगर्जो तडक विजा |**

**वायोबळें ||**

**वायो सुटे सरारां |**

**असंभाव्य पडती गारा |**

समुद्राच्या पाण्याचे बाष्पीभवन होणे आणि पुढे त्यातूनच मेघ तयार होऊन पर्जन्याचा वर्षाव होणे हे जलचक्र समर्थांनी आपल्या रचनेतून सूक्ष्मरीत्या वर्णिले आहे.

**जितुके गिरी तितुक्या धारा |**

**कोंसळती भयंकरा |**

**पाभळ वाहाळा अपारा |**

**उकळ्या सांडिती ||**

जितक्या मोठ्या पर्वतरांगा तितके पर्जन्याचे प्रमाणही मोठे. त्यातूनच पुढे पाण्याची समृद्धी होते.

**ठाईं ठाईं डोहो तुंबती |**

**विशाळ तळीं डबाविती |**

**चबाबिती थबाबिती|,**

**कालवे पाट ||**

त्या पाण्याने जागोजागी जलाशये भरून जातात, परंतु त्यासाठी,

**मेघोदक अंतराळी |**

**वृष्टी करी ||**

मेघाची पर्जन्यवृष्टी होणे महत्वाचे आहे. पावसाचे प्रमाण वाढण्यासाठी पर्वत हा महत्वाचा घटक आहे, असे समर्थांना सुचवायचे आहे.

## ❖ समारोप

साहित्य हा सामाजीवनाचा आरसा असतो. साहित्यात समाजातील घडामोडींचे प्रतिबिंब उमटते. साहित्याच्या विविध प्रकारांतून मानवी जीवनाची जडणघडण होत असते. संतांनी आपल्या साहित्यकृतीतून समाजाला योग्य दिशा देण्याचे काम नेहमीच केले आहे. संत साहित्य हे एकांगी न राहता समाजातील प्रत्येल सूक्ष्म घटकाचा अभ्यास संत साहित्यात आढळतो. मग याला कृषिक्षेत्रही अपवाद नाही. संत ज्या ग्रामीण जीवनात वावरले त्याचे पडसाद त्यांच्या साहित्यावर पडलेले दिसतात. आपल्या अभंगांतून विविध संतांनी कृषिविषयक घटकांचा उल्लेख करून शेतकऱ्याला उत्तम मार्गदर्शन केलेले आहे. यामध्येही विविध साहित्याकृतींत विविधता जाणवते. संतानी आपल्या साहित्यात शेतीविषयक घटकांचा अध्यात्मिक दृष्टांत म्हणूनही उपयोग केला आहे. संत तुकाराम, संत ज्ञानदेव, संत नामदेव, संत एकनाथ, संत चोखोबा, संत सावता माळी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत बहिणाबाई, समर्थ रामदास स्वामी  इत्यादी अनेक संतांनी आपल्या साहित्यरचनेतून शेतीतील निरनिराळ्या घटकांचे वर्णन करून शेतीसाठी उपयुक्त असे मार्गदर्शन केले आहे. संत साहित्य हे फक्त समाजप्रबोधन, लोकशिक्षण, भक्तिमार्ग, अध्यात्म यापर्यंतच सीमित न राहता कृषीसारख्या एक आर्थिक घटकाशी सुद्धा जवळीक साधते. कृषीक्षेत्रातील विविध प्रक्रिया, त्यासाठी शेतकऱ्याने घ्यावयाची काळजी, शेतीची संबंधित वृक्ष, पर्जन्य, मेघ, पशु, इत्यादींविषयी संत साहित्याचे योगदान अमूल्य ठरते.  तत्कालीन संत साहित्य हे आजच्या जागतिकीकरणाच्या काळात सुद्धा शेतकऱ्याला नक्कीच प्रेरित करू शकते.

## ❖ संदर्भ सूची :

१. कुलकर्णी, प्रसाद. संत वाङ्मय आणि समाज प्रबोधन. इचलकरंजी: प्रबोधन प्रकाशन, १९९४.

२. खरात, शंकरराव. संतांची सामाजिक दृष्टी. पुणे: कॉन्टिनेन्टल प्रकाशन, २००५.

३. गांगुर्डे, प्रा. आनंद. "साहित्य आणि पर्यावरण." Scholarly Research Journal for Humanity Science & English Language ७/३३ (२०१९): ८९८२-८९८८.

४. गायकवाड, डॉ. श्रीरंग. ज्ञानबा तुकाराम . २०२२ .

५. जाधव, प्रा. वामन. संत परंपरा आणि कृषिसंस्कृती. पुणे : एम के इन्फोएज्युटेक प्रा. लि. , २०२१ .

६. डॉ. ताहेर एच. पठाण, डॉ. न. ब. कदम. संतसाहित्य मीमांसा (भाषा, संप्रदाय आणि संशोधन). २०१७ .

७. देखणे, डॉ. रामचंद्र. संत साहित्यातील पर्यावरण विचार . पुणे : पद्मगंधा प्रकाशन , १९९४ .

८. देहूकर, डॉ. सदानंद मोरे. निवडक सकल संत सार्थ गाथा . पुणे: सकाळ मीडिया प्रा. लि. , २०१८ .

९. पाटील, डॉ. तानाजी. लोकोत्तर तुकाराम . स्नेहवर्धन प्रकाशन , २०१३ .

१०. भगत, प्रा. रा. तु. संतसाहित्य आणि समाजप्रबोधन . पुणे: दिलीपराज प्रकाशन , २००५.

११. भद्रे, अनिता महादेव. “मराठी संतसाहित्य आणि कृषि एक अनुबंध.” AIIRJ Special Issue No. 18 (२०१८): १३-१७ .

१२. सरदार, गंगाधर बाळकृष्ण. संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुती . पुणे : श्रीविद्या प्रकाशन , १९८२ .